# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात नोंदणीकृत औषध विक्रेत्यांच्या (फार्मासिस्ट) अनुपस्थितऔषधांची विक्री होत असल्याबाबत

**(१) ३२६१८ (१२-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोंदणीकृत औषध विक्रेत्यांच्या (फार्मासिस्ट) अनुपस्थित औषधांची विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान राबविलेल्या मोहिमेमध्ये नोंदणीकृत औषध विक्रेत्यांच्या अनुपस्थितीत औषधे विकणाऱ्या औषध दुकानांवर बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूली विभागवार औषध दुकानांवर बंदी घालण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर दुकानांचा परवाना रद्द करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०९-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अन्न व औषध प्रशासनाने दि. १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये किरकोळ औषध विक्री करणा-या औषध पेढींवर नोंदणीकृत फार्मासिस्ट यांचे निर्देशनाखाली औषध विक्री होते किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व औषध निरीक्षकांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यात मोहीम राबविण्यात आली असून एकूण ३४६० किरकोळ औषध विक्री करणा-या पेढीची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २७७ औषध पेढींमध्ये नोंदणीकृत फार्मासिस्ट यांच्या निदर्शनाखाली औषध विक्री होत नसल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने एकूण २४६ औषध पेढी बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील रुग्णांमध्ये आयर्न (लोह) कमी करण्यासाठी औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(२) ३४६०० (१२-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात थॅलेसेमिया, हिमोफेलीया, ॲनिमिया या सारख्या अनुवंशिक आजाराची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे तसेच सदर रुग्णांमध्ये आयर्न (लोह) कमी करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०९-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.
सदर बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट औषधांची विक्री करणाऱ्यांवर आळा घालण्याबाबत**

**(३) ३४९९९ (१२-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नशा करण्यासाठी डॉक्टरांच्या लिखित चिठ्ठी तसेच प्रमाणपत्राशिवाय विनापरवाना करण्यात येणारी औषधांची विक्री तसेच मोठ्या प्रमाणात औषधांची करण्यात येणारी साठवणूक आणि बनावट औषधांची विक्री करण्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले वा त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) सह आयुक्त तथा नियंत्रण प्राधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २५.०६.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार अन्न व औषध प्रशासनाकडून मोहिम राबविण्यात आली होती. माहे एप्रिल, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीत किरकोळ व घाऊक विक्री परवाना धारकांच्या एकूण ११,९४२ पेढ्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी बनावट औषधांची विक्री करणा-या तसेच औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ मधील तरतूदींचे उल्लंघन करणा-या १९६२ औषध पेढ्यांच्या परवान्यांचे निलंबन करण्यात आले व ४५४ औषध पेढ्यांचे औषध विक्री परवाने रद्द करण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जनुना (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथे धरण बांधण्याबाबत**

**(४) ४९५१९ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जनुना (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथे नदीवर धरण बांधण्यात आल्यामुळे तेथील नागरिकांना २ ते ४ फूट पाण्यातून प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणावर पूल बांधण्याची मागणी तेथील एका राजकीय पक्षाचे अध्यक्ष हे सन २०१० पासून वारंवार शासनाकडे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) कार्यकारी, अभियंता, पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांच्या कार्यालयाकडून रस्त्याची पहाणी केली असता तिथे ५ मी. चे ५ गाळे व ८० मीटर लांबीची संरक्षण भिंत बांधणे आवश्यक आहे. निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकीत काम हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**वडखळ-धरमतर ते अलिबाग व वाशी नाक्यापासून वडखळपर्यंत (ता.पेण, जि.रायगड) असलेल्या पर्यायी रस्त्याची झालेली दूरवस्था**

**(५) ५२५३४ (१८-०१-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडखळ-धरमतर ते अलिबाग रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यालगतच्या वाशी नाक्यापासून वडखळपर्यंत असलेला पर्यायी रस्ता देखील पुर्णपणे खराब झालेला आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, त्यामुळे वाहनांना अडथळे निर्माण होऊन लोकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उपरोक्त रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०९-२०२३) :**(१) वडखळ धरमतर ते अलिबाग हा राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ अ केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. सद्यस्थितीमध्ये धरमतर ते अलिबाग या रस्त्यावर पावसाळयामध्ये पडणाऱ्या खडडयांची दुरुस्ती जी एस बी मटेरियल व कोल्ड मिक्स बिटूमेनने इतर संलग्न कामांसह करण्यात येत असून रस्ता वाहतूकीस योग्य ठेवण्यात येत आहे. पावसाची उघडीप मिळताच सदरील खड्डे हॉट मिक्स डांबरीकरणाने भरण्यात येत आहेत.

(२) व (३) वाशी नाक्यापासून वडखळपर्यंत असलेल्या पर्यायी रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम माहे मार्च २०२३ मध्ये कंत्राटदाराने सुरु केले असून या रस्त्यातील डाव्या बाजूकडील १६ कि.मी.चे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वरित सेवा रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(४) सद्यस्थितीत पावसामुळे रस्त्यावर पडणाऱ्या खड्ड्यांची दुरुस्ती प्रगतीत असून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात येत आहे. वडखळ ते अलिबाग या मार्गावर समांतर रेषेत अलिबाग-विरार कॉरिडोरचे नियोजन असल्याने या मार्गाचा चौपदरीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाने रद्द केला असून सदर मार्ग २ लेन पेव्हड बाजूपट्टीसह सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्याचे नियोजित आहे व सदर रस्ता केंद्रशासनाकडून हस्तांतरित झाल्यानंतर काम हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील साकव मोडकळीस अाल्याबाबत**

**(६) ५४२८६ (२१-०१-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील तब्बल १९१ साकव सद्यस्थितीत मोडकळीस आले असल्याने डोंगराळ व दुर्गम भागातील नागरिकांना धोकादायक साकवांवरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त साकवांच्या दुरुस्ती, पुनर्बांधणी आणि नवीन साकव बांधण्यासाठी भरीव निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०८-२०२३) :** (१) अवर्गीकृत रस्त्यावरील ३८३ साकव नादुरुस्त स्थितीत आहेत व १०६ साकव मोडकळीस आलेले आहेत.

(२) सा.बां.विभागाने दि.२ ऑगस्ट, २०२२ च्या पत्रान्वये निर्गमित सूचनेच्या अनुषंगाने योजनाबाहय रस्त्यावरील साकवांची दुरुस्ती/बांधकामे ही कामे सा.बां.विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहेत. रत्नागिरी जिल्हयातील

साकव दुरुस्ती व बांधकाम करणे ही कामे जिल्हा नियोजन समितीमार्फत मान्यता व निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(७) ५८२५८ (२५-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटसून (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील बस डेपो चौक, पातुर ते राजुरा रस्ता, या रस्त्यावरील नाल्यांवरील पुल तसेच काटसून ते अडगांव रस्त्याच्या पुलाचे दि. ५ व ६ जुलै, २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करणे आवश्यक असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) काटसूर येथील बस डेपो चौकातील दुरुस्तीचे काम वार्षिक देखभाल दुरुस्तीअंतर्गत मंजूर असून सदर काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
पातुर ते राजुरा रस्ता व या रस्त्यावरील नाल्यांवरील दोन पूलांचे काम व काटसून ते अडगांव रस्त्याच्या पूलांच्या दुरुस्तीचे काम निधी, निकर्ष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेवस बंदराचे नुतनीकरण्याबाबत**

**(८) ५८४८२ (०८-०५-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवस बंदराचे नुतनीकरण करण्यात येणार असून नव्याने धक्का आणि इतर सुविधा उभारण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेवस-करंजा रो-रो सुरु करण्यात येणार असून मुंबई, नवी मुंबई ते अलिबाग अंतर कमी होण्यास मदत होऊन इंधन आणि वेळेची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बंदरात मरीना प्रकल्प प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रेवस बंदराच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१५-०९-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.

(४) रेवस येथे रो-रो जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणे या कामाचे कार्यादेश दि. ८.३.२०१९ रोजी देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीपथा वर आहे.

(५) मार्च २०२० ते सप्टेंबर २०२० या कालावधीत का ेविड-१९ च्या अनुषंगाने राज्यामध्ये घोषित केलेला लॉकडाऊन, स्थानिकांच्या मागणीमुळे रो-रो जेट्टीच्या आराखड्यामध्ये करण्यात आलेला बदल,
त्यानंतर तौक्ते चक्रिवादळ व निसर्ग चक्रिवादळ यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे.
सद्यस्थितीत सदरचे काम ६८ टक्के पूर्ण झाले असून डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**सोलापूर जिल्हयात अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(९) ५८६३४ (२५-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात वाहतुकीच्या नियमांकडे होत असलेले दुर्लक्ष, अपुऱ्या तांत्रिक सुविधा व वाहतुकीस अयोग्य असलेले रस्ते यामुळे माहे जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत ९०७ अपघात झाले असून त्यात ५५३ व्यक्तींचा मृत्यु होऊन १ हजार ३५ व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील अपघातांच्या प्रमाणात वाढ होत असून जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार देखील मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयात राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर माहे जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ या दरम्यान एकूण २४२ अपघात असून त्यामध्ये १९० व्यक्ती मयत व २२० व्यक्ती जखमी झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

एन.एच.पुणे- सोलापूर महामार्गावर वरवडे टोल नाका, सावळेश्वर टोल नाका व एन.एच.१६६ सोलापूर-कोल्हापूर महामार्गावर अनकढाळ टोलनाका, अचगाव टोल नाका येथे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत प्रत्येकी १ रुग्णवाहिका आहे. तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर विभागाच्या अखत्यारितील महामार्गावर हेल्पलाईन नं.१०३३ व आपत्कालीन फोनबॉक्स उपलब्ध आहे. तसेच १०८ व ११२ नंबर या अत्यावश्यक सेवा नंबरला कॉल करुन संपर्क केल्यास तात्काळ रुग्णवाहिका येवून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात येते.

(३) वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते. तसेच आय.आर.सी.च्या मानकाप्रमाणे व उद्योजकाच्या करारनाम्याच्या तरतूदीनुसार महामार्गावरील वळणाच्या/दाट वस्तीच्या व आवश्यक ठिकाणी सुरक्षेबाबतचे नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच पथनाटयामार्फत रस्ते सुरक्षाबाबत जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील अन्न औषध प्रशासन विभागाचा कार्यभार परभणी जिल्ह्यातुन होत असल्याबाबत**

**(१०) ६०८१९ (२५-०४-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील अन्न औषध प्रशासन विभागाचे कामकाज परभणी जिल्ह्यातून होत असल्यामुळे तेथे मुदतबाह्य खादृयपदार्थींची राजरोसपणे विक्री होत असून याप्रकरणी कोणतीच कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यात अन्न औषध विभागाचे कार्यालय तात्काळ सुरु करुन नियमित खाद्यपदार्थ्यांची तपासणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०९-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाच्या हिंगोली कार्यालयासाठी अधिकारी व कर्मचारी यांची पदे मंजूर आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या हिंगोली कार्यालयासाठी भुखंड उपलब्ध नसल्यामुळे सदर जिल्ह्याचा कार्यभार परभणी जिल्ह्यातून करण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यासाठी नियुक्त असलेल्या अन्न विभागाच्या अधिकारी व कर्मचा-यांकडून हिंगोली जिल्ह्यातील नियमित खाद्यपदार्थांची तपासणी केली जात आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या हिंगोली कार्यालयासाठी भुखंड उपलब्ध करून देण्याची विनंती जिल्हाधिकारी, हिंगोली यांना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील कोलगाव येथील स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना रोजगार देण्यात येत असल्याबाबत**

**(११) ६१८१४ (२७-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील कोलगाव येथे वेकोलीची प्रचलित कोळसा खाण असून त्यास दोन वर्षापूर्वी एच.आर.गोदरा कंपनीला पाच वर्षाकरिता कंत्राट देण्यात आले असता या कंपनीने एकाही स्थानिक कामगारांना कामावर घेतले नसल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना मोठया प्रमाणात रोजगार दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदूनुसार स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

वेस्टर्न कोल फिल्ड इंडिया,वणी क्षेत्र,चंदपूर हा भारत सरकार चा उपक्रम आहे. तसेच त्यांचे कंत्राट हे जागतिक स्तरावर काढले जातात. वणी क्षेत्रातील कोलगांव कोळसा खाण येथील पर्यवेक्षकीय कामगार मधील स्थानिक टक्केवारी ८५% व इतर कामगारांची स्थानिक टक्केवारी १००% आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साईबाबा संस्थान, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळत नसल्याबाबत

**(१२) ६३०७३ (२६-०४-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि. अहमदनगर) येथील साईबाबा संस्थानच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी, महाविद्यालयात शैक्षणिक सुविधा मिळत नसल्यामुळे धरणे आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यालयात, शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात विषय संख्या आठ व शिक्षक मात्र ४ तसेच ग्रंथालयात पुरेशी व उपयुक्त पुस्तके नसल्यामुळे वर्षभरात बारा ऐवजी फक्त चारच प्रॅक्टीकल झाले आहेत तसेच उपहारगृह असुनही खाद्यपदार्थ नसणे,प्रशस्त खेळाचे मैदान नसणे,तीन वर्षापासून शिष्यवृत्ती न मिळणे अशा वेगवेगळया मागण्यांसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (११-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

महाविद्यालयाकडून प्राप्त खुलाशानुसार सदर महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु असून संगणक शाखेत १९८ विद्यार्थी आहेत. संगणक शाखेच्या संगणकशास्त्र / इलेक्ट्रॉनिक्स या विषयांसाठी एकुण ०८ शिक्षक तसेच गणित या विषयासाठी ०३ शिक्षक असे एकूण ११ शिक्षक कार्यरत आहेत. सदर विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात पुरेशी पुस्तके व आवश्यक ग्रंथालयीन साहित्य उपलब्ध आहे. महाविद्यालयातील संगणक शास्त्रासाठी अद्ययावत प्रयोगशाळा असुन विद्यार्थ्यांसाठी परिक्षेपूर्वी प्रात्यक्षिक व सैध्दांतिक असा सर्व अभ्यासक्रम विहीत वेळेत पूर्ण करण्यात आलेला आहे. महाविद्यालयात उपहारगृह सेवा उपलब्ध असून आवश्यक चहापान व्यवस्था उपलब्ध आहे. श्री. साईबाबा संस्थानच्या वतीने नवीन शैक्षणिक संकुल अद्ययावत सेवा सुविधा तसेच क्रीडांगण, जलतरण तलाव आवश्यक सुविधांसह निर्माण करण्यात आलेले आहे. तसेच, उच्च शिक्षण विभागामार्फत महाडिबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येणा-या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ सन २०२०-२१ मध्ये १११ विद्यार्थी सन २०२१-२२ मध्ये ८२ विद्यार्थी आणि सन २०२२-२३ मध्ये या महाविद्यालयातील १०४ विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे. शिष्यवृत्तीपासून लाभार्थी विद्यार्थी वंचित राहिल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कायम विनाअनुदानित वरिष्ठ ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याबाबत

**(१३) ६४६९२ (०१-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या कायम विनाअनुदानित वरिष्ठ ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याबाबत दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्यावेळी दिनांक ३० एप्रिल, २०२३ पर्यंत वित्त विभागाच्या त्रुटी पूर्ण करुन सदर प्रस्ताव मान्य करुन याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन शालेय शिक्षण मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सर्व त्रुटींचे निराकरण करुन याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्राव्दारे शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) दि. २४.११.२००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना/ विद्याशाखांना १००% अनुदानावर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून औषध विक्रेत्यांची दिशाभूल होत असल्याबाबत

**(१४) ६४८१४ (२९-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औषध विक्रेत्यांनी ग्राहकांची फसवणूक न करता कायद्याच्या चौकटीतच राहून व्यवसाय करावा, यासाठी त्यांच्यावर देखरेख करण्याचे काम राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाकडून करण्यात येत असून औषध दुकानदारांकडून कायद्याचे पालन करतांना अनावधानाने होणाऱ्या छोट्यामोठ्या त्रुटींवर प्रशासनाद्वारे त्यांचे औषध विक्रीचे परवाने काही कालावधीकरिता प्रलंबित ठेवण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अनेक वेळा छोट्या त्रुटींसाठीसुध्दा औषध विक्रेत्यांवर अवाजवी शिक्षा केली जात असून याविरोधात संबंधित मा. मंत्री महोदयांकडे अपील करण्याची तरतूद कायद्यात असल्यामुळे औषध विक्रेते अपील करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपीलावर स्थगनादेश देणे किंवा यावर सुनावणी लावून निर्णय देणे अपेक्षीत असतांना मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी औषध विक्रेत्यांकडून पैसे मागत असल्याच्या तक्रारी मा. मुख्यमंत्री मा.उपमुख्यमंत्री व त्या विभागाच्या संबंधीत मंत्र्यांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उचित कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
अन्न व औषध प्रशासनाद्वारे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ मधील तरतुदीनुसार केल्या जाणा-या नियमित तपासण्यांमध्ये आढळलेल्या दोषांचे गांभीर्य विचारात घेवून संबंधित परवानाधारकांचे परवाने कमी-जास्त कालावधीसाठी निलंबित अथवा रद्द करण्याची कारवाई करण्यात येते. सदर आदेशाविरुध्द परवाना धारक औषध विक्रेते औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ च्या नियम ६६(२) मधील तरतूदीनुसार राज्य शासनाकडे अपील दाखल करतात.
(३) हे खरे आहे.
द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस ॲण्ड ड्रगिस्टस असोशिएशन, मुंबई यांनी दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित मंत्र्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

(४) या प्रकरणी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस ॲण्ड ड्रगिस्टस असोशिएशन, मुंबई यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) पंचायत समिती आवारातील शासकीय गोदामाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१५) ६४९७० (३०-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील पंचायत समिती आवारात रास्त दरातील धान्याचा साठा करण्यासाठी सन १९६५ मध्ये बांधण्यात आलेल्या शासकीय गोदामाची इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर गोदामाची तात्काळ दुरुस्ती अथवा नव्याने गोदाम उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (०४-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम उपविभाग राजापूर यांचेकडून सदर गोदामाची किरकोळ दुरूस्ती एप्रिल, २०२३ मध्ये पूर्ण करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर गोदाम इमारत वापरात आहे.
निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी शहरातील मिऱ्या येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ६५१०० (३०-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी शहरातील मिऱ्या येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम मोजणी फी च्या वादामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बंधारा बांधण्याच्या कामासाठी अति तातडीने जागा मोजणीसाठी ३३ लाख रुपये फी भूमि अभिलेख विभागाकडे भरणा करायची असून सदर रक्कम भरण्यावरुन पत्तन (हार्बर) विभाग व रत्नागिरी नगरपरिषद यांच्यात वाद सुरु असल्यामुळे सदर बंधाऱ्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धूप प्रतिबंध बंधाऱ्यांचे काम तात्काळ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.
सदर कामाच्या एकूण ३४०० मीटर लांबीपैकी नगरपालिकेच्या हद्दीतील ९०० मीटर लांबीमध्ये संयुक्त मोजणी न झाल्याने प्रलंबित आहे.
(२) हे खरे नाही.
नगरपालिका हद्दीतील जागेच्या मोजणीसाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद रत्नागिरी यांनी शिघ्र फी रु.३३.३६ लक्ष रुपये भरणेबाबत कळविले होते. तद्नंतर नगर भूमापन अधिकारी, रत्नागिरी यांना न्युनतम फी कळविण्यास विनंती केली असता त्यांनी कळविलेली न्युनतम फी रु.२,७८,०००/- विभागीय कार्यालयामार्फत माहे जून २०२३ मध्ये मुख्याधिकारी,

नगरपरिषद रत्नागिरी यांचेकडे भरणा करण्यात आली आहे. मुख्याधिकारी, नगरपरिषद रत्नागिरी यांनी फी व कागदपत्रे माहे जुलै २०२३ मध्ये नगर भुमापन रत्नागिरी यांचे कार्यालयास भरणा केली असून त्यांनी संयुक्त मोजणी माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये करण्याबाबत कळविण्यात आले आहे. संयुक्त मोजणी पूर्ण झाल्यानंतर काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंत्रालय (मुंबई) येथील दुसऱ्या मजल्यावरील सार्वजनिक बांधकाम विभागातील उंदीर मारण्यासाठी देण्यात आलेल्या कंत्राटामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१७) ६५३८५ (३१-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालय (मुंबई) येथील दुसऱ्या मजल्यावरील सार्वजनिक बांधकाम विभागात उंदरांनी फाईल, झेरॉक्स पेपर, कार्यालयीन पेपर, वायर इत्यादी वस्तु कुरतडल्यामुळे हजारो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, 2023 च्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यामध्ये वा त्या दरमयान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयातील उंदीर मारण्यासाठी यापूर्वी दिलेल्या कंत्राटामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार किती रक्कमेचा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे तसेच यात दोषी आढळलेल्या व्यक्ती व संस्थेविरोधात कारवाई करुन उंदरांचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही
(२) व (३) हे खरे नाही.
यापूर्वी मे २०१६ मध्ये उंदीर मारण्याच्या कंत्राटाबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून वेळोवेळी पेस्ट कंट्रोल करण्यात आल्याने उंदरांचा प्रादुर्भाव कमी झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरासाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी श्रेणी १ यासह इतर वाढीव पदे निर्माण करण्याबाबत**

**(१८) ६५४३० (३०-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरासाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी श्रेणी १ यासह इतर वाढीव पदे निर्माण करण्यासाठी विभागीय आयुक्त नाशिक यांचेमार्फत जिल्हाधिकारी नाशिक यांनी दि. ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे, नागपूर, औरंगाबाद व सोलापूर या विभागीय मुख्यालय असलेल्या शहरांप्रमाणे नाशिक शहरासाठी सुद्धा उपजिल्हाधिकारी संवर्गातील अन्न धान्य वितरण अधिकारी हे पद निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि. १० मे, २०२२ व दि. १२ जुलै, २०२२ रोजी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुके व २ धान्य वितरण अधिकारी कार्यक्षेत्र असून एकूण २६०९ रास्तभाव दुकाने आणि राज्यातील सर्वाधिक नियतन व लाभार्थी संख्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) नुसार नाशिक जिल्ह्याची सर्वाधिक लाभार्थी संख्या व नियतन या अतिरिक्त कामाचा विचार करता नाशिक शहरासाठी अन्न धान्य वितरण अधिकारी श्रेणी १ यासह इतर वाढीव पदे निर्माण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२६-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव ह्या महानगरपालिका क्षेत्रातील विभागीय क्षेत्राप्रमाणे नवीन अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय स्थापन करण्यास व त्याकरीता आवश्यक अन्नधान्य वितरण अधिकारी (उप जिल्हाधिकारी दर्जाचा) -१ पद, निरीक्षण अधिकारी- २ पदे, पुरवठा निरीक्षक-२० पदे, लिपिक टंकलेखक-१० पदे निर्मितीस व वाहनचालक-१ आणि शिपाई-३ पदे निर्मितीसह बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र आंभोरा (ता.कुही,जि.नागपूर) येथे महाराष्ट्र राज्य मराठी विद्यापीठाची निर्मिती करण्याबाबत**

**(१९) ६५५७६ (२८-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राचीन महाराष्ट्रातील मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांनी प्राचीन अंबानगरी सद्याचे श्रीक्षेत्र आंभोरा येथे शके १११० मध्ये मराठी भाषेतील काव्यरुपातील पहिला ग्रंथ "विवेकसिंधू" येथे बसून लिहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीक्षेत्री पवनविजय, परमामृत अशी मराठीच्या आद्यरचनेतील ग्रंथ परंपरा निर्माण केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याठिकाणी महाराष्ट्र राज्य मराठी विद्यापीठाची निर्मिती व्हावी, अशी सर्व स्तरातून मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने माहिती व निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे;
(३) होय;
(४) सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अर्थसंकल्प सादर करतेवेळी रिद्धपूर, जि. अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेबाबत घोषणा करण्यात आली असून, त्यानुषंगाने दिनांक ११ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे तसेच दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर समितीचा विस्तार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भात उत्पादक शेतक-यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन अनुदानात झालेला गैरव्यवहार**

**(२०) ६६०५२ (३०-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भात उत्पादक शेतक-यांच्या खात्यात शासनाने भात खरेदीची जमा केलेली प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम बोनसच्या नावाखाली दलालांकडून हडप करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेल्हे-केळद (ता.वेल्हे, जि.पुणे) रस्त्याचे काम निकृष्ट झाले असल्याबाबत**

**(२१) ६६२९८ (३१-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे-केळद (ता.वेल्हे, जि.पुणे) या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कोटयवधी रुपयांचे काम सुरु असून हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर पर्यटक, ग्रामस्थ प्रवासी यांची नियमित वर्दळ असल्याने या रस्त्याचे काम दर्जेदार होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम दर्जेदार करण्यासह काम निकृष्ट करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही,

महाड मढेघाट वेल्हे नसरापुर चेलाडी रस्ता रा.मा.१०६ या रस्त्यावर वेल्हे ते केळद दरम्यान १६.५३० कि.मी. लांबीत अस्तित्वातील ३.७५ मी रुंदीमध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, तसेच वळणाच्या ठिकाणी रस्त्याचे अतिरिक्त रुंदीकरणाचे काम करारनाम्यातील तरतूदीनुसार प्रगतीत आहे.

(२) होय हे खरे आहे,

सदर कामे करारनाम्यातील तरतूदीनुसार प्रगतीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) ६६४१४ (३०-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी दोन, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अशी अंदाजे ३१३ पदे रिक्त असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०९-२०२३) :** (१) होय.

३१३ पदे रिक्त आहेत. तथापि, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे अंतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत असणा-या सहाय्यक अभियंता श्रेणी-२, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्याकडून कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

(अ) सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) संवर्गाची ३०१ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

(ब) कनिष्ठ अभियंता संवर्गातील ५३२ पदे भरण्याची कार्यवाही निवड समितीमार्फत सुरु आहे.

(क) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील १३७८ पदे भरण्याची कार्यवाही निवड समितीमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाघवे-भैरी-कुंड ते म्हैसोंडे-वाघवे-अडखळ (ता.दापोली. जि. रत्नागिरी) या गावांना जोडणारा नदीवरील पूल व जोड रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ६६४५७ (३१-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघवे (ता.दापोली,जि.रत्नागिरी) या महसूली गावाच्या वाघवे-भैरी-कुंड ते म्हैसोंडे-वाघवे-अडखळ या गावांना जोडणारा नदीवरील पूल व जोड रस्ता नसल्याकारणाने तेथील नागरिकांना व विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोर जावे लागत असून तसेच मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,(२) असल्यास, सदरहू नदीवरील पूल व जोडरस्त्याचे काम विनाविलंब हाती घेऊन रस्ता वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील पाच वर्षाहून अधिक कालावधीपासून लेखी निवेदनाव्दारे सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालक मंत्री रत्नागिरी जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उप अभियंता सा. बा. उपविभाग दापोली, जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदींकडे सातत्याने मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार वाघवे भैरी कुंड ते म्हैसोंडे वाघवे अडखळ या गावांना जोडणारा नदीवरील पूल व जोड रस्त्याच्या कामास मंजूरी देऊन व निधी उपलब्ध करुन सदर कामे तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.
(२) निवेदन अप्राप्त.
(३) व (४) निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकीत काम हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**राज्य शासनाने "पायाभूत सुविधा महामंडळ" स्थापन करण्याच्या फेरनिर्णयाबाबत**

**(२४) ६६८८२ (३१-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पायाभूत सुविधा विकास महमंडळाची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने दि. ०५ मे, २०२३ रोजी वा तया सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त, नियोजन, महसूल आणि परिवहन विभागाने सदरहू महामंडळ स्थापन करणेबाबत आक्षेप नोंदवूनही तसेच रस्ते, पूल व इमारतीचे बांधकाम पायाभूत सुविधांचे प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती आदि कामे रस्ते विकास महामंडळ करीत असताना शासनाने स्वतंत्र पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त महामंडळ स्थापन करण्याचे निकष व त्याचे स्वरुप काय आहे,त्याकरिता किती रुपये निधीची आवश्यकता आहे तसेच आवश्यक निधीची तरतुद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१०७/ नियोजन-१अ, दि.२२.५.२३ अन्वये महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) या मंडळामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील तालुका व तालुका जोडणारे रस्ते, जास्त वाहतूक वर्दळ असलेल्या किंवा पर्यटन स्थळांना जोडणाऱ्या प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग यामधून तसेच विविध योजनांमधून रस्ते सुधारणा करण्यात आलेल्या रस्त्यांची वाहतूक वर्दळ विचारात घेऊन प्रकल्पामध्ये निवड करण्यात येईल.

सार्वजनिक खाजगी भागीदारीची कामे राबविण्यासाठी सदर महामंडळ मुख्यत्वेकरुन इतर राज्यात काम करेल आणि शासन ते शासन जमा योगदान प्रकल्पांसाठी काम करेल. रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ.२२ पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांतील प्रकल्प राबविण्यासाठी व त्यासाठी निधी उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत शासकीय मालकीच्या नवीन महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.
(३) व (४) महामंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या खर्चाची तरतूद करणे, संचालक मंडळाची नियुक्ती करणे, महामंडळ मुख्यालय उपलब्ध करणे इ. तद्अनुषंगिक विषयक कार्यवाही प्रगतीत आहे.

महामंडळाची औपचारिकरित्या नोंदणी झाल्यानंतर त्याचे कामकाजास सुरुवात करण्यात येईल.

---

**राज्यात दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करणेबाबत**

**(२५) ६७६७२ (०१-०९-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास बालेवाडी क्रीडा संकुलात अपंग मुला-मुलीच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिव्यांग कल्याण या स्वतंत्र विभागाची निर्मिती केली असल्याने अपंगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरु करुन दिव्यांगाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी दिव्यांग विद्यापीठाची स्थापना करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०९-२०२३) :**(१) होय; हे खरे आहे,
(२) कार्यवाही प्राथमिक टप्प्यात आहे,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी विद्यापीठ स्थापनेकरिता अशासकीय तज्ञांची समिती नेमण्याबाबत

**(२६) ६७७०७ (२८-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठी भाषा वृद्धीसाठी मराठीतून रोजगार विकासाची संधी उपजीविकेच्या साधनात वाढ याकरिता मराठी विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी विद्यापीठ स्थापनेसाठी अशासकीय तज्ञांची समिती नेमण्याबाबत शासनाच्या वतीने तीनदा घोषणा करण्यात आली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत अशासकीय सदस्यांची समिती स्थापन करण्यात न आल्याने मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीचे प्रमुख डॉक्टर श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मा. उपमुख्यमंत्री व मा. उच्च तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे समिती स्थापन करण्याबाबत मागणी केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी विद्यापीठ स्थापन करण्याकरिता अशासकीय तज्ञांची समितीची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०९-२०२३) :** (१) होय;
(२) होय;
(३) होय;
(४) मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने दिनांक ११ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच, दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समितीचा विस्तार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुजरात राज्यातून आलेल्या गोंडा मिरचीच्या मसाल्याची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(२७) ६७७५० (२८-०८-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुजरात राज्यातून आलेल्या गोंडा मिरचीचा रंग मसाला बनविल्यानंतर फिका पडत असून त्याची गुणवत्ताही निकृष्ट दर्जाची असल्याचे दिनांक २४ मे, २०२३ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लालबाग (मुंबई) येथील मसाला मार्केटमधील मसाला व्यापाऱ्यांनी सदर बाब अन्न व औषधे प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणूनही मसाल्यामध्ये असणाऱ्या पावडर माती व गुणवत्तेची चाचणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०९-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

दि.२५.०५.२०२३ च्या दैनिक वृत्तपत्रात हलक्या दर्जाच्या गोंडा मिरचीचा ठसका अशा आशयाची बातमी प्रकाशित झाली होती. तथापि, अन्न व औषध प्रशासनाच्या असे निर्दशनास आले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अन्न व औषध प्रशासनाकडून संबंधित मसाला विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. तथापि, तपासणीवेळी गोंडा मसाला मिरचीचा साठा आढळून आला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाल (ता.रावेर, जि.जळगांव) या गावातील वन प्रशिक्षण संस्थेला जोडणाऱ्या पूलाबाबत**

**(२८) ६७८२८ (३१-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाल (ता.रावेर, जि.जळगांव) या गावातील वन प्रशिक्षण संस्थेला जोडणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाली असून तसेच येथील पूल पावसात वाहून तुटून गेल्यामुळे गत अनेक वर्षापासून वन प्रशिक्षणार्थी, शालेय विदृयार्थी, पर्यटक तसेच वन कर्मचाऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने पूल निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.
(२) दादासाहेब चौधरी वनप्रशिक्षण संस्था, पाल कडे जाणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत नाही. तथापि, सदर वन प्रशिक्षण संस्थेने केलेल्या विनंतीस अनुसरुन संस्थेकडे जाणाऱ्या मार्गावरील सुकी नदीवर पुलाचे बांधकाम करण्यासाठी रु.११.०१ कोटी एवढया किंमतीचे अंदाजपत्रक तयार करुन देण्यात आले आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर-गोवठे-दोनिवडे-चिखलगाव रस्त्याची (जि.रत्नागिरी) उंची वाढविण्याबाबत**

**(२९) ६७९९१ (३१-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिवृष्टीत दरवर्षी अर्जुना नदीचे पाणी राजापूर-गोवठे-दोनिवडे-चिखलगाव रस्त्यावर (जि.रत्नागिरी) साचत असल्यामुळे रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी उक्त रस्त्याची उंची वाढविण्याची मागणी गत अनेक वर्षापासून ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याची उंची वाढविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर रस्त्याची उंची वाढविण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याकरीता रस्त्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## माढा ते वैराग (जि.सोलापूर) या राज्य मार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(३०) ६८०७३ (३१-०८-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर तिर्थक्षेत्राकडे जाणाऱ्या माढा-वैराग या राज्य मार्गावरील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने येथे अपघात होऊन अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावरून माढा, उंदरगांव, दारफळ सिना, केवड, जामगांव, मानेगांव, धानोरे देवी, कापसेवाडी, हटकरवाडी, मालवंडी, सुर्डी, इर्ले इत्यादी गावातील नागरीक प्रवास करीत असून या रस्त्याच्या दुरुस्तीकडे शासन व सार्वजनिक बांधकाम दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने या संपूर्ण रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधीची तरतुद केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) माढा ते वैराग रामा २०३ या रस्त्याची लांबी ५२.५० कि.मी. आहे. सदर रस्त्यावर १२.४ कि.मी. लांबीत नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. १२.७ कि.मी.लांबीत रस्ता सुधारणा करणेची रक्कम रु.११.९० कोटी ची कामे प्रगतीत आहेत. ४ कि.मी. लांबीत रक्कम रु. ४.८ कोटी चे मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे. उर्वरित लांबीतील रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची कामे वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दर्यापूर (जि अमरावती) शहराच्या बाहेरून बायपास कार्यान्वित करणेबाबत

**(३१) ६८१०८ (३१-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर शहराच्या मध्यभागातून अकोला, वाशिम, अमरावती, मेळघाट, बुलढाणा, बैतुल, मध्यप्रदेश येथे ये-जा करणाऱ्या प्रवाशांच्या वाहतुकीमध्ये वाढ झाली असल्याने शहराच्या बाहेरून बायपास कार्यान्वित करण्याची मागणी येथील नागरिक तथा विविध संघटनांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बायपास झाल्यास शहरातील रस्त्यावरील वाहतुकीचा भार कमी होऊन अपघातांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दर्यापूर शहराच्या बाहेरून बायपास कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०९-२०२३) :** (१) नाही
(२) रस्ते विकसित करताना अकोट दर्यापूर वलगाव रस्ता राज्यमार्ग ४७ ची ३.३० कि.मी. व अंजनगाव दर्यापूर मुर्तिजापूर राज्यमार्ग २८२ ची १.६० कि.मी. लांबी चारपदरी करण्यात आली आहे. सदर लांबी चारपदरी झाल्याने वाहतुक व दळणवळण व्यवस्थित होत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील भिमा नदीवर विठ्ठलवाडी व सांगवी सांडस या गावांदरम्यान पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(३२) ६८११० (३१-०८-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विठ्ठलवाडी (ता. शिरुर,जि.पुणे) व मौजे सांगवी सांडस (ता. हवेली, जि. पुणे) या गावांदरम्यान भिमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा के.टी. वेअर असून या के.टी. वेअर वरुन धोकादायक वाहतूक होत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी पुलाचे बांधकाम झाल्यास दोन्ही बाजूच्या नागरिकांची १५ किमी अंतराच्या वेळेत बचत होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या भिमा नदीवर विठ्ठलवाडी व सांगवी सांडस या गावांदरम्यान भिमा नदीवर पुल कम बंधारा होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-१०-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.
(२) हो, हे खरे आहे.
(३) व (४) निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकीत काम हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**मोर्शी-सिंभोरा-आष्टी रा.मा. २९२ या रस्त्यावरील पुलाची उंची वाढविण्याबाबत**

**(३३) ६८२९५ (३१-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी-सिंभोरा-आष्टी रा.मा. २९२ या रस्त्यावरील अप्पर वर्धा धरणाच्या जवळच असणाऱ्या पुलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळयात धरणाचे अतिरीक्त पाणी सोडल्यास या रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विद्यार्थी, रुग्ण व स्थानिक नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन पुलाची उंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०९-२०२३) :** (१) पावसाळयात धरणाचे अतिरिक्त पाणी सोडल्यानंतर पुलावरुन पाणी वाहते, तेव्हा २ ते ३ दिवसाकरीता वाहतुक बंद करावी लागते, हे खरे आहे.
(२) वाहतुकीकरीता पुल बंद झाल्यानंतर पर्यायी मार्गाने वाहतूक वळविली जाते.
(३) व (४) सदर ठिकाणी उच्च पातळीच्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यास निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**बीड तालुक्यातील ३० रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी देऊन निधी देण्याबाबत**

**(३४) ६८५६२ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील 30 रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने येथील नागरीकांना रस्त्याअभावी विशेषत: विद्यार्थी, रुग्ण, जेष्ठ नागरीक इत्यादींना अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधीनी पत्राद्वारे दि. १३ जून, २०२३ वा त्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या कामाची पाहणी करण्यात आली आहे काय व त्यानुसार किती रस्त्यांची कामे सुरु करण्यात आली व त्यासाठी किती निधी मंजूर करण्यात आलेला आहे,

(३) नसल्यास, या रस्त्यांच्या कामांना त्वरीत मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकीत कामे हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील साखर-मार्गासनी या पुलाचे काम प्रलंबित असलेबाबत**

**(३५) ६८५९९ (३१-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील साखर-मार्गासनी पुलासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येवूनही अदृयापि पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याने पावसाळयात राजगड खो-याचा संपर्क तुटण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे सदर पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी संबंधितांकडे वारंवार करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाचे काम लवलकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-१०-२०२३) :**(१) व (२) चिरमोडी साखर मार्गासनी प्रजीमा ४१ वर कि.मी. ४/८०० वर कानंदी नदीवर साखर गावाजवळ १० मीटर चे एकूण ८ गाळे एकूण ८० मीटर लांबीच्या व ७.५० मीटर रुंदीच्या मोठ्या पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. त्यापैकी साखर गावाकडील ३ गाळयांचे काम व मार्गासनी गावाकडील २ गाळे असे एकूण ५ गाळयांचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम ऑक्टोबर २०२३ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत अस्तित्वातील पुलावरुन वाहतूक चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा येथे आयुर्वेदाच्या नावावर बनावट औषध विकणाऱ्या औषध विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३६) ६८९४१ (२८-०८-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथे प्रमुख मार्गावरील मोकळया जागेवर अनधिकृपणे तात्पुरती दुकाने उभारुन प्रमाणित नसलेली आयुर्वेदिक औषधांची विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट आयुर्वेदिक औषध विक्रेते आयुर्वेदाच्या नावाखाली निरनिराळया रोगांची नावे घेवून त्याच्यावर रामबाण औषध असल्याचे सांगून रुग्णांची हजारो रुपयांची फसवणुक करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अनेक गावांत मेडीकल स्टोर नसल्याने किराणा दुकानातून दुप्पट किंमतीत सर्दी, खोकला व तापाच्या औषधांची विक्री होत असून याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०९-२०२३) :**(१) सदर बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यात धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(३७) ६८९५३ (३०-०८-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात शासनाकडून आधारभूत धान खरेदी केन्द्र माहे मे, २०२३ पर्यंत सुरु न झाल्याने शेतकऱ्यांना उन्हाळी धान पिकाची विक्री करता आली नसल्याने अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे धानाचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अद्याप जिल्ह्यात धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्यांना कमी किंमतीत धानाची विक्री करावी लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यात तात्काळ धान खरेदी केंद्र सुरु करण्याची मागणी धान उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी जिल्ह्यात धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०३-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) रब्बी पणन हंगाम २०२२-२३ धान खरेदीचा कालावधी दि.०१.०५.२०२३ ते दि.३०.०६.२०२३ असा निर्देशित असून भंडारा जिल्ह्यात धान खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी ४७७०२ इतकी झालेली आहे. तथापि, सदरची मुदत दि.१०.०७.२०२३ पर्यंत वाढविली होती.

जिल्हा धान खरेदी संस्था व केंद्र निवड समितीच्या दि.१८.०४.२०२३ सभेमध्ये मंजूर झाल्यानुसार भंडारा जिल्ह्यात दि.३० जून २०२३ अखेर २६१ खरेदी केंद्र सुरु असून सदर उपसंस्थेकडून जिल्ह्यात नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांकडून दि.२२.०५.२०२३ ते दि.१०.०७.२०२३ अखेर २६९५८ शेतकऱ्यांकडून ११,२३,९५०.८२ क्विंटल धान खरेदी झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे निश्चित करण्याबाबत**

**(३८) ६९०३२ (२८-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च महाविद्यालयात नियुक्त असलेले प्राध्यापक (प्रोफेसर ग्रेड (AL-१४) आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे यु.जी.सी. व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार एकाच दर्जाची पदे आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीमध्ये प्राचार्याचे सेवानिवृत्ती ६२ वर्षे व प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीची ६० वर्षे नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार अनुसरुन नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्यातील प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षेपर्यंत करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) व (२) राज्यातील अकृषि विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय दि. ०८.०३.२०२१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पदवी महाविद्यालयातील (Under Graduate) प्राचार्यांना सहयोगी प्राध्यापक समकक्ष वेतन (ॲकॅडेमीक लेव्हल १३-ए) तसेच पदव्युत्तर महाविद्यालयातील प्राचार्यांना प्राध्यापक समकक्ष वेतन (ॲकॅडेमीक लेव्हल १४) लागू करण्यात आले आहे.

अकृषि विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याचा आणि उर्वरित अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच प्राचार्यांना ६२ व्या वर्षानंतर ६५ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे तथापि ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागातील पात्र प्राचार्यांची कमतरता असल्याची बाब लक्षात घेता, अशा प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय सरसकट ६५ वर्षे करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडविण्यासाठी समिती गठीत करण्‍याबाबत**

**(३९) ६९३०४ (२८-०८-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषध विक्रेत्यांना सुरळीतपणे व्यवसाय करता यावा हा शासनाचा प्रयत्न असतानाही राज्यस्तरावर औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडविण्यासाठी एक समिती स्थापन करावी अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच व्यवसाय करताना येणा-या जाचक अटी दूर कराव्यात, तसेच बोगस औषधांची विक्री होत असलेल्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशाही सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०९-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) फार्मासिस्ट संघटनेच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य अध्यक्षतेखाली बुधवार, दि.१७.०५.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्य स्तरावर औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडविण्यासाठी दि.०३.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेली समिती पुर्नजिवित करून सुधारित समिती गठित करणे तसेच किरकोळ व घाऊक पेढ्यांवर तपासणी दरम्यान आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी कायद्यातील तरतुदीनुसार व समप्रमाणात तपासणी करण्याबाबतचे निर्देश दिले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०९.०८.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने क्र. बैठक-२०२३/सं. क्र. ७२/औषधे-२, दि. ०८.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली एक समिती व सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव, अन्न व औषध प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली एक समिती अशा द्विस्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(४०) ६९३४३ (३१-०८-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ज्या कामांच्या निविदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते त्यामध्ये प्रस्तावित किंमतीपेक्षा ३० टक्के कमी दराने (below level) टेंडर भरले जातात व अशाच ठेकेदारांना कामे दिली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिलो लेव्हल टेंडर भरल्यामुळे कामाचा स्तर (दर्जा) राहत नाही व त्यामुळे कामे अपेक्षित कालावधी पेक्षा फार लवकर खराब होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विहित कालावधी पेक्षा कमी कालावधीत एकापेक्षा जास्त वेळा रस्ता दुरुस्तीवर होणारा खर्च शासनाच्या निधीचा अपव्यय असल्याने या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही,

कामांच्या निविदा ई-निविदा प्रणालीमार्फत प्रसिध्द करण्यात येत असून स्पर्धात्मक पध्दतीने निविदा प्रक्रीया करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

सदर कामे करारनाम्यातील अटी व शर्ती नूसार कार्यान्वित करण्यात येतात .

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्हातील रस्त्यांवर मे. टेलिसोनिक नेटवर्क लि. या कंपनीने मोबाईल टॉवरसाठी ऑप्टीकल फायबर केबल ( O.F.C ) टाकण्यासाठी दिलेल्या परवांनगीचे उल्लंघन केल्याबाबत

**(४१) ६९४०७ (३१-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हसळा (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील दिघी-म्हसळा-माणगाव या डांबरी रस्त्यावर मौजे चिखलप ते दांडगुरी व म्हसळा-श्रीवर्धन दरम्यानच्या रस्त्यावर मे. टेलीसोनिक नेटवर्क लि. या कंपनीने मोबाईल टॉवरसाठी ऑप्टीकल फायबर केबल (O.F.C ) टाकण्यासाठी दिलेल्या परवांगीचे उल्लंघन करून बेकायदेशीररित्या रोड शोलडरमध्ये केलेल्या खोद

कामासंदर्भात श्री.अंजुम मेहमुद भांडविलकर व म्हसळा येथील ग्रामस्थांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांच्याकडे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-१०-२०२३) :**(१) निवेदन प्राप्त आहे.
(२) दिघी म्हसळा माणगांव रस्ता रामा - ९८ कि.मी. २३ /९०० ते २६ /०० या लांबीमध्ये २१००.०० मी. साईडपट्टी व ११.०० मी. डांबरी पृष्ठभाग, चिखलप दांडगुरी रस्ता प्रजिमा-५७ कि.मी. ०/०० ते १०/८०० या लांबीमध्ये १०८००.०० मी. साईडपट्टी व ११.०० मी. डांबरी पृष्ठभाग व श्रीवर्धन म्हसळा लोणेरे रस्ता रामा-९९ कि.मी. ०/०० ते १५ /२०० व या लांबीमध्ये १५२००.०० मी. साईडपट्टी व ११.०० मी. डांबरी पृष्ठभाग कि.मी. १६ /०० ते १७/०० या लांबीमध्ये १०००.०० मी. साईडपट्टी व ११.०० मी.डांबरी पृष्ठभाग पुर्ववत करणे साठी संबंधित कंपनीने शासकीय नियमानुसार महसूल जमा करुन केबल टाकण्याचे काम केले आहे. काम करतांना योग्य ती खबरदारी घेण्यात आली होती तसेच केबल टाकण्याचे काम करतांना कोणताही अपघात, जीवीत वा वित्तीय हानी झालेली नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देगलूर (जि.नांदेड) सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता नियमबाहय वसुली करीत असल्याबाबत

**(४२) ६९४१७ (३१-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर (जि.नांदेड) सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता श्री.कोटलवार हे ठेकेदारांच्या कामांचे देयक देण्यासाठी ८ टक्के नियमबाहय पैसे घेत असल्याचे माहे मे-२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कार्यकारी अभियंता श्री.कोटलवार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-१०-२०२३) :**(१) नाही.
(२) व (३) या संदर्भात कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त न झाल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात अन्न व औषधे प्रशासनाची प्रयोगशाळा नसल्याबाबत

**(४३) ६९४९१ (३१-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात अन्नात भेसळ केली जात असून नामांकित कंपनीचे लेबल लाऊन अन्न पदार्थांची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील अन्न प्रशासनाने घेतलेले पदार्थाचे नमुने तपासणी करीता नागपूर किंवा अमरावती येथे पाठवावे लागतात, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतचे अहवाल योग्य वेळेत प्राप्त होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास बुलढाणा जिल्ह्यात प्रयोग शाळा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२७-०९-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्यांतर्गत नियम व नियमने मधील तरतूदीनुसार अन्न नमुन्याचे विश्लेषण अहवाल १४ दिवसांचे आत देणे आवश्यक आहे. तथापि, अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेत मनुष्यबळाची कमतरता व अन्न नमुने विश्लेषण क्षमतेपेक्षा विश्लेषणाकरीता येणा-या अन्न नमुन्यांची संख्या बरीच जास्त असल्याने विश्लेषण अहवाल योग्य वेळेत प्राप्त होण्यास विलंब होत आहे.
(४) अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेवरील अतिरिक्त ताण विचारात घेता, अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण करण्याकरीता अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली व अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत अन्न नमुन्यांचे खाजगी प्रयोगशाळेकडून विश्लेषण करून घेण्यासाठी GeM PORTAL वर निविदा मागविण्याची प्रक्रिया अन्न व औषध प्रशासनाकडून सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईसह परिसरात असुरक्षित जारमधून मोठया प्रमाणात पाण्याची विक्री होत असल्याबाबत

**(४४) ६९५६७ (३१-०८-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : तारांकित प्रश्न क्रमांक ४९७७८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह परिसरात असुरक्षित जारमधून मोठया प्रमाणात पाण्याची विक्री केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्री होणाऱ्या पाण्याची गुणवत्ता तपासण्याची तसेच त्याच्या नियंत्रणाची कोणतीही यंत्रणा नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०९-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) पाण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्टस ॲन्ड फूड ॲडिटिव्हे) नियमन २०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे नमुने विश्लेषणासाठी नियमितपणे घेण्यात येतात.

तथापि, जार मधील पाणी हे अन्न सुरक्षा व मानके कायद्यामधील कलम ३(१)(i) नुसार अन्न पदार्थाच्या व्याख्येत /संज्ञेत येत नसल्याने खुल्या स्वरुपातील अथवा जारमध्ये विक्री होत असलेल्या पिण्याच्या पाण्याचे नमुने अन्न व औषध प्रशासनाकडून घेण्यात येत नाहीत.
(3) राज्यातील जार (कुल जार), मोठ्या बाटल्या किंवा डब्यामधून पिण्याच्या पाण्याच्या उत्पादन व विक्री करणाऱ्या उत्पादक व वितरकाना पाणी उत्पादक/वितरक" हा परवाना देणेच्या उद्देशाने FSS Food Products & Food Additives २०११ च्या Regulation २.१०.९ Drinking water (Purified) मध्ये JAR (COOL JAR) large

bottles, cans/containers manufacturing for drinking water without any sealed package, हा अन्न पदार्थ अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ३(१)(j) नुसार अन्न पदार्थाच्या व्याखेत अंतर्भूत करण्याबाबत विधी व न्याय विभागास अभिप्राय देण्यास विनंती करण्यात आली आहे. सदरचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठातील प्राध्यापक भरतीबाबत**

**(४५) ६९७०१ (०१-०९-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात कोरोनामुळे न झालेली सहायक प्राध्यापक भरती तीन वर्षानंतर पुन्हा सुरू करण्यात आलेली असता व्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या तीन विषय तज्ञांच्या गैरकारभारामुळे पुन्हा पुढे ढकलण्यात आली असल्याची माहिती दिनांक २२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरती प्रकिया दिनांक २४ जून, २०२३ रोजीपासून सुरू होणार होती परंतू पुढे ढकलण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजी विद्यापीठाचा दहावा दीक्षांत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाकरिता मा.राष्ट्रपती महोदया उपस्थित राहणार होत्या. सदर कार्यक्रमाचा व्याप लक्षात घेऊन सहायक प्राध्यापक पदांच्या मुलाखती पुढे ढकलण्याचा ठराव व्यवस्थापन परिषदेकडून पारित करण्यात आला होता. त्यानुसार विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पदांच्या दि.२१.०६.२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीची प्रक्रिया दि.२८.०७.२०२३ रोजी पुर्ण झाली असून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे निर्गमित करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापिठाच्या एम.एससी. (M.Sc.) पार्ट-२ सेमिस्टर-३ चा निकालाबाबत**

**(४६) ७०१४२ (०१-०९-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापिठाअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या एम.एससी. (M.Sc.) पार्ट-२ सेमिटर-३ चा निकाल माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान घोषित झाला असून सेंटर २० माणगांव मधील अनेक विद्यार्थ्यांना शून्य गुण देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी विद्यार्थ्यांचा निकाल उशिरा घोषित करुन उत्तरपत्रिका अयोग्य पद्धतीने तपासून विद्यार्थ्यांना शून्य गुण दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठातील एम.एससी. (M.Sc.) पार्ट-२ सेमिटर-३ चा निकालाची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या गुणांचे योग्य मूल्यमापन करुन निकाल देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१८-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
मुंबई विद्यापीठकडून प्राप्त माहितीनुसार विद्यापीठाअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या एम.एससी. पार्ट-२ सेमिटर-३ चा निकाल दि.१७ जून, २०२३ रोजी घोषित करण्यात आला. केंद्र क्र. २० माणगाव या केंद्रावर सदर परीक्षेत ४७ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी अनुत्तीर्ण असून कोणत्याही विद्यार्थ्याला शून्य गुण दर्शवून निकाल जाहीर करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे विद्यापिठाने महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परिक्षेचा (सेट) निकाल लावण्यास विलंब केल्याबाबत**

**(४७) ७०५३६ (०१-०९-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दिनांक २६ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परिक्षेचा (सेट) निकाल विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार ४५ दिवसाच्या आत घोषित करणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठाने अद्यापही परिक्षेचा निकाल देण्यास विलंब केल्यामुळे सदर पदांच्या भरतीसाठी इच्छुकांना संधी गमविण्याची भिती निर्माण झाल्याचे दिनांक ०२ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तेलंगणा, गुजरात आदि राज्यांच्या तुलनेत पुणे विद्यापीठाने सेट परिक्षेच्या निकालास विलंब लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, पुणे विद्यापिठाचे प्रशासकीय कामकाज गतीमान करुन निकाल वेळेत लागावा यासाठी प्राध्यापक पदासाठी सहाय्यक प्राध्यापकांना संधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१८-०९-२०२३) :** (१) महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात येत असून विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) विद्यार्थी संख्या व भौगोलिक आवाका जास्त असल्याने निकालाच्या कालावधी मध्ये बदल संभवतो. परंतु, मागील दहा परीक्षेपेक्षा २०२३ च्या सेट परीक्षेचा निकाल कमी कालावधीत घोषित करण्यात आला आहे.
(४) महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात येत असल्याने विद्यापीठामार्फत पुढील सेट परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याबाबतची शक्यतेची पडताळणी करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकृषी व शासनमान्य अभिमत विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांबाबत

**(४८) ७०८२७ (२९-०८-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषि व शासनमान्य अभिमत विद्यापीठांमधील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने आलिकडेच मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २६६८ मंजूर प्राध्यापकांच्या पदांपैकी १४३२ जागा रिक्त असून त्यातील ६५९ पदांची भरती होणार आहे, खरे आहे काय,

(३) असल्यास, जाहिराती काढण्यासाठी शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत नसल्यामुळे जाहिराती काढण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहा वर्षापासून रखडलेली पदभरती प्रक्रिया तातडीने करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२३) :**(१) (२), (३) व (४)

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ व दि.१६.११.२०२२ अन्वये अकृषि विद्यापीठे व शासनमान्य अभिमत विद्यापीठासाठी मंजूर असलेल्या शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत ६५९ पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे. त्यानुसार बिंदूनामावली तयार करुन व आरक्षण निश्चिती करुन पदभरती करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती (रिध्दपूर) मराठी विद्यापीठ स्थापनेसाठी विलंब होत असल्याबाबत

**(४९) ७०९१२ (२९-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी अमरावती जिल्हयातील रिध्दपूर येथे मराठी विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा दि. ०९ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुकारास सभागृहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मराठी विद्यापिठाच्या स्थापनेसाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती १५ दिवसांत स्थापन करण्यात येईल, असे शासनाकडून जाहीर करण्यांत येऊनही सदर समिती स्थापन करण्याबाबत आतापर्यंत तीन वेळी जाहीर करण्यांत येऊनही समिती अद्याप स्थापन करण्यांत आली नसल्याचे दिनांक १२ जून, २०२३ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत राज्यातील साहित्यिकांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तसेच मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांना वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही त्याप्रकरणी समिती स्थापनेची कार्यवाही शासनाकडून करण्यांत आली नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दरम्यानच्या काळात याप्रकरणी कोणती कार्यवाही केली अथवा करण्यांत येत आहे तसेंच समिती स्थापन करण्यांत आली असल्यास, समितीची रचना काय आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-१०-२०२३) :**(१) होय;

(२), (३) व (४) मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने दिनांक ११ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती गठीत

करण्यात आली आहे. तद्नंतर दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नव्याने ७ सदस्यांचा समावेश करुन समितीचा विस्तार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवापूर (ता.नवापूर, जि.नंदूरबार) येथील शासकीय विश्रामगृहाच्या व्ही.आय.पी.कक्षाचा गैरवापर होत असल्याबाबत

**(५०) ७१०६० (३१-०८-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (ता.नवापूर, जि.नंदूरबार) येथील शासकीय विश्रामगृहाच्या व्ही.आय.पी. कक्षात एका विशीष्ट पक्षाचा राजकीय वापर व प्रचार होत असून येथे अनेक गैरप्रकार होत असल्याने याबाबत एका राजकीय पक्षाच्या अध्यक्षाने मा. मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकार हा येथील उपविभागीय अधिकारी, सा. बां. उपविभाग, नवापूर यांच्या संगनमताने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्याची मंत्रालयीन स्तरावर चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करणे तसेच सदर गैरप्रकार बंद करुन विश्रामगृहात सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही. राजकीय पक्षाच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे याबाबत तक्रार केल्याचे आढळून आले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सा.बां.उपविभाग, नवापूर विश्रामगृहाच्या आवारात सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.